**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्य सरकारच्या ५०० सेवा सामान्य नागरिकांना व्हॉट्सॲपवर मिळणार

- चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत देशाचा जीडीपी दर वाढून ६ पूर्णांक २ दशांश टक्क्यावर

- येत्या शैक्षणिक वर्षापासून राज्यभरातले अकरावीचे प्रवेश ऑनलाइन करण्याचा शासन निर्णय जारी

- सातत्यानं सुरू असलेल्या घसरणीमुळे देशातले शेअर बाजार ९ महिन्यातल्या नीचांकी पातळीवर

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात केरळचा पहिला डाव ३४२ धावांवर संपुष्टात, विदर्भाला ३७ धावांची आघाडी

**<><><><><>**

राज्य सरकारनं फेसबुक आणि व्हॉट्सअपची प्रवर्तक असलेल्या मेटा या कंपनीसोबत सामंजस्य करार केला आहे. याद्वारे व्हॉट्सॲप गव्हर्नन्स ही संकल्पना प्रत्यक्षात आणली जाणार आहे. यामुळे राज्य सरकारच्या ५०० सेवा सामान्य नागरिकांना व्हॉट्सॲपवर मिळणार आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. मुंबई टेक वीक २०२५ या कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर ते 'गव्हर्निंग द फ्युचर - एआय अँड पब्लिक पॉलिसी' या विषयावर बोलत होते.

एनपीसीआय या जगातल्या सर्वात मोठ्या युपीआय पेमेंट गेटवे कंपनीचे जागतिक मुख्यालय मुंबईत सुरु केलं जाणार आहे. त्यासाठी आवश्यक जमीन

कंपनीला हस्तांतरित केली जाणार असून त्याची कागदपत्रं आज कंपनीला सोपवण्यात आल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

केंद्र सरकारनं नवीन फौजदारी दंड संहिता लागू केली आहे. शक्ती कायद्यातल्या अनेक तरतुदी त्यात समाविष्ट आहेत. त्यामुळं शक्ती कायद्याचं स्वरुप बदलून नवीन आणावा लागणार असल्याचं ते म्हणाले.

**होल्ड बाईट - देवेंद्र फडनवीस ( ३६ सेकंद)**

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत देशाचा जीडीपी अर्थात स्थूल राष्ट्रीय उत्पादन ६ पूर्णांक २ दशांश टक्के इतका वाढला आहे. दुसऱ्या तिमाहीत हा दर ५ पूर्णांक ६ दशांश टक्के इतका होता. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं आज सुधारित आकडेवारी जारी केली आहे. यामुळे जगातली सर्वात वेगानं वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून भारतानं आपलं स्थान कायम ठेवलं आहे. चालू आर्थिक वर्षात देशाचा जीडीपी साडे ६ टक्क्यांनी वाढण्याची आशा या आकडेवारी व्यक्त केली आहे.

२०२३-२४ या आर्थिक वर्षात हा दर ९ पूर्णांक २ दशांश टक्के इतका होता. कोरोनानंतरच्या आर्थिक वर्षाचा अपवाद वगळता हा गेल्या १२ वर्षातला सर्वाधिक दर आहे.

**<><><><><>**

भारत आणि युरोपियन युनियन यांच्यात वर्ष अखेरपर्यंत मुक्त व्यापार करार पूर्ण करण्याचे निर्देश प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयन यांनी आज दिले. सचिव तन्मय लाल यांनी आज दुपारी नवी दिल्लीत वार्ताहरांना ही माहिती दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयन यांच्याशी चर्चा केली. या कराराबाबत

वाटाघाटी सुरू असल्याचं तन्मय लाल यांनी सांगितलं. पुरवठा साखळी आणि कौशल्य वाढवणं, सेमीकंडक्टरच्या सामंजस्य कराराबाबत चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं. भारताचं एआय मिशन आणि युरोपियन एआय ऑफिसमध्येही सहकार्य वाढत असल्याचं ते म्हणाले. हरित ऊर्जेवर संशोधन प्रकल्पांसाठी ६ कोटी युरोचा निधी जाहीर करण्यात आला असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**<><><><>**

ईपीएफओ अर्थात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या विश्वस्त मंडळाने २०२४-२५ साठी कर्मचाऱ्यांच्या ईपीएफ ठेवींवर सव्वा ८ टक्क्यांचा व्याजदर कायम ठेवण्याची शिफारस केली आहे. ही शिफारस केंद्रीय अर्थ मंत्रालयाकडे मंजुरीसाठी पाठवली जाईल. मंजुरीनंतरच व्याजाची रक्कम ईपीएफओ खात्यात जमा केली जाईल.

**<><><><>**

येत्या शैक्षणिक वर्षापासून राज्यभरातले इयत्ता ११ वीचे प्रवेश ऑनलाइन करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. यासंदर्भातला शासन आदेश आज प्रसिद्ध झाला. आतापर्यंत केवळ मुंबई महानगर क्षेत्र, पुणे, पिंपरी-चिंचवड, अमरावती, नागपूर आणि नाशिक महापालिका क्षेत्रातले ११ वी चे प्रवेश ऑनलाइन होत होते. इयत्ता ११ वी चे सर्व प्रवेश ऑनलाइन होणार असले तरी पहिल्या ४ फेऱ्या झाल्यानंतर वर्ग सुरू होतील.

**<><><><>**

पुण्यातल्या स्वारगेट बस स्थानक महिला अत्याचार प्रकरणी आरोपी दत्तात्रय गाडे याला न्यायालयानं १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. मध्यरात्री त्याला शिरूर तालुक्यातल्या गुनाट गावातून अटक केली होती. हे प्रकरण द्रुतगती न्यायालयात चालवलं जाईल, अशी माहिती पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

<><><><><>

सातत्यानं सुरू असलेल्या घसरणीमुळे देशातले शेअर बाजार ९ महिन्यातल्या नीचांकी पातळीवर पोहोचले आहेत. आज मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स १ हजार ४१४ अंकांची घसरण नोंदवत ७३ हजार १९८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ४२० अंकांनी घसरुन २२ हजार १२५ अंकांवर स्थिरावला. गेल्या वर्षी जून महिन्यात शेअर बाजार या पातळीवर होते. सप्टेंबर महिन्याच्या अखेरच्या ऐतिहासिक उच्चांकी पातळीच्या तुलनेत बाजार १५ टक्क्यांनी घसरले आहेत.

जागतिक पातळीवर असलेलं अस्थिर वातावरण, अमेरिकेकडून विविध देशांवर लादले जाणारं आयात शुल्क, यासारख्या कारणांमुळे बाजारात घसरण सुरू असल्याचं विश्लेषकांनी सांगितलं.

<><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत, नागपूर इथं सुरु असलेल्या अंतिम सामन्यात आज तिसऱ्या दिवसअखेर केरळचा पहिला डाव ३४२ धावांवर संपला. त्यामुळे विदर्भाला पहिल्या डावात ३७ धावांची आघाडी मिळाली.

केरळचा आदित्य सरवटे आज ७९ धावांवर बाद झाला. त्यानंतर कर्णधार सचिन बेबीनं डाव सावरण्याचा प्रयत्न केला. त्याचं शतक थोडक्यात हुकलं. तो ९८ धावांवर बाद झाला. इतर फलंदाज दीर्घ खेळी करु शकले नाहीत. विदर्भातर्फे दर्शन नळकांडे, हर्ष दुबे आणि पार्थ रेखाडे यांनी प्रत्येकी तीन गडी बाद केले.

<><><><><>

चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज लाहोरमध्ये सुरु असलेल्या सामन्यात अफगाणिस्ताननं ऑस्ट्रेलियापुढं विजयासाठी २७४ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

अफगाणिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला, आणि निर्धारित ५० षटकात ८ गडी गमावून २७३ धावा केल्या. सादीकुल्लाह अटलनं ८५, अजमतुल्ला उमरझईनं ६७ धावा केल्या, ऑस्ट्रेलियातर्फे बेन ड्वारशुइसनं ३, तर स्पेन्सर जॉन्सन आणि अॅडम झांपा यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या -६ षटकात १बाद ६४ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

महिलांच्या प्रिमिअर लीग क्रिकेट स्पर्धेत, आज मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅप्टिल्स यांच्यात सामना होत आहे. बंगळुरु इथं थोड्याच वेळात म्हणजे साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

दिल्ली कॅप्टिल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला.

**<><><><><>**

वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट संमेलन ‘व्हेवज् एक्सप्लोरर चॅलेंजच्या माध्यमातून कथाकार आणि रचनाकारांना युट्यूब शॉर्ट्स तयार करून आपला भारताबाबतचा दृष्टिकोन जगासमोर मांडण्याची संधी देत आहे. या शॉर्ट्सद्वारे ते भारताची विविधता, प्रामाणिकपणा आणि प्रतिभा टिपू शकतात. शॉर्ट्सचा आशय रचनाकाराचा स्वतःचा असणं आवश्यक आहे. व्लॉगसाठी तयार केलेला व्हिडीओ जास्तीत जास्त ७ मिनिटांचा, तर शॉर्ट्स जास्तीतजास्त १ मिनिटाचा असावा.

माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं आयोजित केलेल्या व्हेवज् या कार्यक्रमाचा हा प्रमुख उपक्रम असून तो येत्या १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणार आहे.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली. कोकणात काही ठिकाणी, तर विदर्भात तुरळक ठिकाणी किंचित वाढ झाली.

राज्यात सर्वात कमी किमान तापमान अहिल्यानगर इथं १४ पूर्णांक ७ शतांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//